# वनस्पतीशास्त्रच्या माजी विद्यार्थ्यांचे ५० हजार

## 'सकाळ'मुळे सासू-सुनेच्या मदतीसाठी सरसावले हात

**कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठाच्या परिसरातील चहागाडीवाल्या आजीबाई शुभांगी पाटील व त्यांच्या सून वैष्णवी पाटील यांना विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या माजी विद्यार्थ्यांनी पन्नास हजार रुपयांची आर्थिक मदत दिली. जयसिंगपूर येथील एका प्राध्यापकांनी अठरा हजार रुपयांच्या मदतीचा हात पुढे केला.**


फक्कड चहात सासू-सुनेच्या नात्याचा गोडवा

'सकाळ'मध्ये 'सासू-सुनेच्या फक्कड चहात नात्याचा गोडवा,' शीर्षकाखाली वृत्त प्रसिद्ध झाले होते. त्यात पाटील कुटुंबातील कर्त्या पुरुषांच्या निधनानंतर सासू-सुनेने संघर्षातून कशी वाटचाल पुढे सुरू ठेवली, नात सीमरन व धनश्री यांचा शैक्षणिक खर्च पेलताना त्यांची होणारी धावपळ त्यात सविस्तर मांडण्यात आली होती. चहागाडीवर वनस्पती अधिविभागाचे माजी विद्यार्थ्यांची (कै.) अमर पाटील यांच्याशी चांगली मैत्री होती. पाटील कुटुंबीयांना हातभार लावण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. त्यांनी एकत्र येऊन पन्नास हजार रुपये जमा केले. ही रक्कम त्यांनी सासू-सुनेकडे सुपूर्द केली. माजी विद्यार्थिनी वंदना पाटील, मुक्ता गावडे, अश्विनी पाटील, राणी लिमकर, प्रीती बाबानगरे, स्वाती वायदंडे, संदीप गोसावी, सुरो पाटील, राहुल महामुनी, विनोद गोसावी, अमोल बंडगर, उमेश पवार, मयूर नंदीकर, सागर देशमुख, सचिन पाटील, अमोल महामुनी यांच्यासह भेरूमल ओसवाल, राजेंद्र शिंगटे, भानुदास बाचल, शंकर कुंभार, विजय पाटील, प्रमोद चित्राव, कुलशेखर शर्मा, अभिषेक गरिकीपाटी यांच्याकडून ही मदत करण्यात आली.

दरम्यान, नाव न प्रसिद्ध करण्याच्या अटीवर जयसिंगपुरातील एका प्राध्यापकांनी त्यांना अठरा हजार रुपयांची मदत दिली आहे. 'सकाळ'मधील बातमी नंतर पाटील सासू सुनेस शिवाजी विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांकडून मदतीचा ओघ सुरू आहे.

# सीईटी देणाऱ्या विद्यार्थ्यांची नंतर परीक्षा

## कुलगुरू शिर्के : विद्यार्थ्यांना कोविड विमा कवच देणार

लोकमत न्यूज नेटवर्क,

---

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ परीक्षा व विधि शाखेत प्रवेशासाठी सीईटी अशा दोन्ही परीक्षा एकाच दिवशी होणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये. याकरिता अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा नंतर घेतली जाईल, असे आश्वासन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी दिले. यासंदर्भात प्रजासत्ताक सामाजिक सेवा संस्थेचे अध्यक्ष दिलीप देसाई व कॉमन मॅन संघटनेचे अध्यक्ष ॲड. बाबा इंदुलकर यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांची भेट घेतली. याप्रसंगी त्यांनी हे आश्वासन दिले.

शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम सत्राच्या काही शाखेच्या परीक्षा सोमवारी (दि.२) व मंगळवारी (दि.३) होत आहेत. त्याच दिवशी विधि शाखेला प्रवेश घेणाऱ्यांसाठी द्यावी लागणारी सीईटी प्रवेश परीक्षा होणार आहे. या परीक्षेसाठी बसणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होणार आहे. ही बाब 'प्रजासत्ताक'चे देसाई व कॉमन मॅनचे इंदुलकर यांनी कुलगुरु डॉ. शिर्के यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यावर कुलगुरू डॉ. शिर्के यांनी अशा विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही. त्यांच्याकरिता विद्यापीठ परीक्षा नंतर घेतल्या जातील, असे आश्वासन व लेखी पत्र त्यांनी दिले. यावेळी झालेल्या चर्चेत विद्यापीठ कर्मचाऱ्यांसोबत परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनासुद्धा विद्यापीठाच्या खर्चाने कोविड विमा कवच उपलब्ध केले जाईल. शहाजी लॉ कॉलेजमध्ये एल.एल.एम. या पदव्युतर अभ्यासक्रमासही मान्यता दिली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.